**महत्वाचे**

जा. क्र मृदसं/मफुजअ/राकृवियो/मा.सू.12-13/
/ न.क्र.104 / 2009/ 2012
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र. राज्य,
पुणे 411 001. दिनांक 21/8/2012.

**प्रति,**

1. जिल्हाधिकारी (सर्व)
2. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)

**विषय** :- महात्मा ज्योतिबा फुले जल व भुमी अभियान अंतर्गत राष्ट्रिय कृषि विकास योजनेतून उपलब्ध झालेल्या निधीतून राबवावयाच्या कार्यक्रम सन 2012-13 करीता मार्गदर्शक सुचना.

**संदर्भ :-** 1) शा.नि.क्र.मफुअ -2012/प्र.क्र.37/जल-8 ग्राम विकास व जल संधारण विभाग,मंत्रालय मुंबई 32 दिनांक 28/3/2012
2) शा.नि.क्र.मफुअ -2012/प्र.क्र.76/जल-8 ग्राम विकास व जल संधारण विभाग,मंत्रालय मुंबई 32 दिनांक 09/08/2012

महात्मा ज्योतिबा फुले जल व भुमी संधारण अभियान या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जुन्या जलस्त्रोतांचे बळकटीकरण करणे हा असून सदरचा कार्यक्रम सन 2002 पासून राज्यात राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत अनेक गावात लोकसहभागातून, श्रमदानाने पाझर तलाव/गाव तलावातील गाळ काढणे, सिमेंट नालाबांधातील/नालाबांधातील गाळ काढणे,पाझर/गाव तलावांची दुरुस्ती/नुतनीकरण करणे, नालाबांध फुटतूट दुरुस्ती, जलस्त्रोतांचे पुनर्भरण इत्यादी कामे करण्यात आलेली आहेत. या अभियानातंर्गत झालेल्या कामांच्या दृष्यपरिणामामुळे जलसंधारणाचे व श्रमदानाचे महत्व जनमानसात दृढ झाले असून सदर कार्यक्रम सन 2012-13 मध्ये राबविण्यांस संदर्भ क्र.1 चे शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यांत आली आहे.

संदर्भीय क्र. 2 अन्वये ग्राम विकास व जल संधारण विभागाने महात्मा ज्योतिबा फुले जल - भुमी संधारण अभियान सन 2012-13 मध्ये अनुषंगिक खर्चासाठी राष्ट्रिय कृषि विकास योजनेतून निधी उपलब्धतेबाबत शासन निर्णय निर्गमीत करणेत आलेला आहे.या शासन निर्णयानुसार खालील बाबीवर खर्च करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

1. **<u>प्रचार व प्रसिध्दी</u>** - अभियानाच्या प्रचार व प्रसिध्दी करीता प्रत्येक तालुक्यासाठी रक्कम रू. 1 लाख याप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. (परिशिष्ठ अ). सदरचा निधी तालुका स्तरावर उपलब्ध करून देण्यात यावा. प्रसिध्दीसाठी प्राप्त झालेल्या निधीतून तालुका/उपविभागीय/जिल्हा स्तरावर मेळाव्याचे आयोजन करणे, पोस्टर्स, घडी पत्रिका छापणे, स्थानिक वृत्तपत्रामधून प्रसिध्दी देणे, स्थानिक आकाशवाणी केंद्रावरून प्रसिध्दी देणे, बस स्थानकावरून जिंगल्सव्दारे अभियानाची प्रसिध्दी, अभियानाच्या यशोगाथा तयार करणे, ग्रामपंचायती/ शाळा, भिंती रंगवणे इ. बाबीवर सदरचा खर्च करता येईल. अभियानाचा जास्तीतजास्त प्रसार करून लोकसहभाग वाढविणेसाठी प्रयत्न करण्यात यावे.

2. जलसंपदा विभागाकडून उपलब्ध होणाऱ्या शासकीय यंत्र सामग्रीचे भाडे अदा करणे व इतर अनुषंगीक बाबीसाठी निधी उपलब्ध करणे. -

   खालील बाबींकरता अनुदान देय राहील.

   अ. जल व मृदसंधारण कामांची दुरूस्ती.

   ब. कोल्हापुरी पध्दतीच्या बंधाऱ्यांना दरवाजे बसविणे.

   क. मृद संधारण व लघु पाटबंधरे प्रकल्पामधील गाळ काढणे.

   ड. वनराई व कच्चे बंधारे बांधणे.

   इ. खोल सलग समतल चर (डीप सीसीटी)

   ई. विहीरींचे पुनर्भरण

3. **कार्यपध्दती :**

   3.1. सदर अभियानातील जास्तीतजास्त कामे लोकसहभागातून पूर्ण करण्यात यावीत. लोकसहभाग कमी असल्यास अशा ठिकाणी शासकीय निधी खर्च करावा.

   3.2. विविध जलस्त्रोतातील गाळ काढण्याकरीता प्रथम जेसीबी, पोकलेन किंवा तत्सम मशिनरी विनामुल्य मिळविण्याचा प्रयत्न करावा.

   3.3. वर नमूद केल्याप्रमाणे विनामुल्य सामग्री उपलब्ध झाल्यास त्याकरीताचा डिझेल, वंगण अणि यंत्रसामग्रीच्या वाहतुकीचा खर्च हा यंत्रसामग्रीच्या आणण्याच्या ठिकाणापासून ते जलस्त्रोताचे ठिकाण व नंतर त्याचे मुळ ठिकाणापर्यंत अनुज्ञेय राहील.

   3.4. वर नमूद केल्याप्रमाणे यंत्रसामग्री विनामुल्य उपलब्ध न झाल्यास जलसंपदा विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक 25.08.2011 च्या शासन निर्णयानुसार 50 टक्के सवलतीच्या दराने शासकीय यंत्रसामग्री उपलब्ध करून प्राप्त झालेला निधी भाडयापोटी खर्च करता येईल.

4. **<u>निधीची उपलब्धता</u>**

या कार्यक्रमांकरीता राष्ट्रिय कृषि विकास योजनेअंतर्गत सन 2012-13 करीता प्रथम हप्तात वितरीत करण्यांत आलेला निधी रक्कम रू.30.00 कोटीचे जिल्हा निहाय वितरण परिशिष्ठ अ मध्ये दर्शविण्यांत आलेले आहे.उपलब्ध करून देण्यांत आलेला निधी हा दि.27.7.2012 रोजी 50 टक्केपेक्षा कमी पाऊस असलेल्या तालुक्यांकरीता तसेच उर्वरीत तालुक्यांकरीता स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यांत आलेला आहे.

4.1. दिनांक 27.07.2012 रोजी सरासरीच्या 50 टक्केपेक्षा कमी पाऊस असलेल्या तालुक्यांची यादी सोबत **परिशिष्ट ब** मध्ये जोडलेली आहे. दुष्काळी परिस्थितीवर मात करणेसाठी मुददा क्र. 2 मध्ये नमूद केलेली उपचाराची कामे घेता येतील.

**परिशिष्ट ब** मध्ये दर्शविण्यात आलेल्या तालुक्याकरीता उपलब्ध होणारा निधी स्वतंत्रपणे दर्शविण्यात आलेला आहे. **दुष्काळी परिस्थितीवर मात करण्याच्या अनुषंगाने हा विशेष कार्यक्रम असल्याने या तालुक्यांकरीता उपलब्ध होणारा निधी त्याच तालुक्यांकरीता खर्च करण्यात यावा.** या तालुक्यांकरीता प्रति तालुका रू. 48.54 लाख या प्रमाणे निधी मंजूर असून पहिल्या हप्त्यात प्रति तालुका रक्कम रू. 30.34 लाख याप्रमाणे जिल्हा निहाय निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

4.2 **परिशिष्ट अ** मध्ये दर्शविण्यात आलेले तालुके वगळता उर्वरीत तालुक्यांकरीता प्रति जिल्हा रक्कम रू. 30 लाख याप्रमाणे निधी मंजूर असून पहिल्या हप्त्यात प्रति जिल्हा रक्कम रू. 18.75 लाख याप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.सदरचा निधी जिल्हयातील इतर तालुक्यांमध्ये आवश्यकतेनुसार उपचार कामावर खर्च करण्यात यावा.

**4.3** **प्रसिध्दी** : अभियानास जास्तीतजास्त प्रसिध्दी देऊन लोकसहभाग वाढविणेकरीता प्रति तालुका रक्कम रू.1 लाख याप्रमाणे 353 तालुक्यांकरीता रू. 353 लाख इतका निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

जिल्हयाकारीता उपलब्ध होणारा निधी विचारात घेऊन जिल्हास्तरीय समितीने अभियानांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचा लक्षांक यंत्रणानिहाय निश्चित करून देण्यात यावा.

**5. <u>जलस्त्रोतातील गाळ काढणे -</u>**

मृद व जलसंधारण विभागाच्या विविध योजनेअंतर्गत माती/सिमेंट नालाबांधाची कामे करण्यात आलेली आहे. सदर बंधाऱ्यामध्ये पावसाच्या पाण्याबरोबर गाळ वाहून आल्याने बंधारा बांधतेवेळी निश्चित करणेत आलेला पाणीसाठा सद्या गाळ साचल्यामुळे होऊ शकत नाही. त्यामुळे या कामासाठी करण्यात आलेली सार्वजनिक गुंतवणूक विना उपयोगी पडून राहते व त्यापासून मिळणाऱ्या लाभापासून शेतकरी वंचित राहतो.सिमेंट नाला बांध, माती नाला बांध,

पाझर/गावतलाव  यासारख्या जलस्त्रोतांमधून गाळ काढताना खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात यावा.

**5.1** जिल्हास्तरीय समितीने यंत्रणेनिहाय/ तालुकानिहाय लक्षांक निश्चित करुन देणेत यावा.

ज्या यंत्रणेकडे निधी वर्ग करणेत येणार आहे, त्या यंत्रणेमार्फत नजीकच्या कालावधीत उपलब्ध करुन दिलेला निधी संपूर्णपणे खर्च होऊ शकेल व तसे त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र मिळू शकेल, याबाबत खात्री करणेत यावी. कोणत्याही परिस्थितीत यंत्रणेकडे विनाकारण निधी पडून राहणार नाही याची दक्षता घेणेत यावी. ज्या यंत्रणेला निधी उपलब्ध करुन दयावयाचा आहे त्या यंत्रणेकडून नजीकच्या कालावधीत खर्च होणार नसेल तर अशा यंत्रणेला लगेच निधी उपलब्ध करुन न देता पुढील हप्त्यात उपलब्ध होणाऱ्या निधीमधून निधी उपलब्ध करुन दयावा.

**5.2** गाळ काढणेसाठी वापरावयाच्या यंत्रसामग्रीचा खर्च मुददा क्र.3 मध्ये नमूद केल्याप्रमाणे देय राहील.गाळ वाहतूकीकरीता वापरण्यात येणाऱ्या मशिनरीच्या इंधनासाठी निधी देय राहणार नाही.

**5.3** गाळ काढण्याची खोली ही सर्वसाधारणपणे बांध बांधतेवेळी त्या ओढयाची/ नाल्याची जी मूळ पातळी होती तितक्या खोलीपर्यंत गाळ काढणेत यावा.यामुळे वाहून आलेल्या गाळाने कमी झालेला पाणीसाठा पूर्ववत होऊ शकेल.

**5.4** पाझर/गाव तलावातील गाळ काढताना संबंधित यंत्रणेकडील प्रचलित मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करणेत यावा.

**5.5** गाळ काढणेपूर्वी व गाळ काढलेनंतरचे छायाचित्र, चित्रफीत, वर्तमानपत्रातील कात्रणे इ. चे जतन करुन ठेवण्यात यावे.

**6. जलस्त्रोतांची दुरुस्ती करणे** :- मृद व जलसंधारण विभागाच्या विविध योजनेअंतर्गत माती/सिमेंट नालाबांधाची कामे करण्यात आलेली आहे. ही कामे सर्वसाधारणपणे 10 ते 15 वर्षापूर्वीची असल्याने अतिवृष्टी व अन्य कारणामुळे फुटतूट झालेली आहे.अशा फुटतूट झालेल्या बांधाची दुरुस्तीकरीता कोणत्याही योजनेत निधी उपलब्ध नसल्याने सदर बांधाची देखभाल झालेली नाही. अशा बांधाची किरकोळ स्वरुपाची फुटतूटची कामे न झाल्यास सार्वजनिक गुंतवणूक विनाकारण पडून राहते व त्यापासून मिळणाऱ्या लाभापासून शेतकरी वंचित राहतो. सिमेंट नाला बांध, माती नाला बांध, पाझर/गाव तलाव यासारख्या जलस्त्रोंतांच्या दुरुस्तीसंदर्भात खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात यावा.

**6.1** तालुका कृषि अधिकारी/ मंडळ कृषि अधिकारी यांनी ज्या बांधाची किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती करावयाची आहे अशा बांधाची स्थळ पाहणी करुन जागा निश्चिती करावी.

**6.2** ज्या बांधाची दुरुस्ती करावयाची आहे, अशा बांधाच्याबाबतीत आर्थिक निकष लावता येणे शक्य होणार नाही, कारण सदरचे बांध हे सर्वसाधारणपणे 10-15 वर्षापूर्वीचे असल्याने त्यावेळचे दर सध्याच्या दरापेक्षा कमी होते, त्यामुळे दुरुस्ती करावयाच्या

बांधाची पाहणी करुन सर्वसाधारणपणे भौतिकदृष्टया संबंधित बांधाचे दुरुस्तीचे काम 30 ते 40 टक्केपेक्षा अधिक असणार नाही, अशी खात्री उपविभागीय कृषि अधिकारी यांनी केल्यानंतरच सदर बांधाचे दुरुस्तीचे काम करता येईल व तसे प्रमाणपत्र उपविभागीय कृषि अधिकारी यांनी देणे आवश्यक राहील.

**6.3 दुरुस्तीअंतर्गत करावयाच्या बाबी** :- सांडवा दुरुस्ती, दर्जा भरणे, कोपींग दुरुस्ती, विंगवॉलची दुरुस्ती, पाणऊशीची दुरुस्ती यासारखी सिमेंट नाला बांधाची कामे करता येईल.माती नाला बांधा अंतर्गत सांडवा दुरुस्ती, सांडवामध्ये सिमेंट क्राँकीटचे दार करणे, पिंचींगची दुरुस्ती करणे व बांधाच्या मुख्य भिंतीची दुरुस्ती करणे, यासारखी कामे घेता येतील याकरीता उपविभागीय कृषि अधिकारी यांनी स्थळ पाहणी करुन तसे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

**6.4** दुरुस्ती करण्यापूर्वीचे व दुरुस्तीनंतरचे फोटो अंदाजपत्रकासोबत जतन करुन ठेवावेत.

**6.5** उपविभागीय कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांचे तांत्रिक सुचनेनुसार कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक यांनी अंदाजपत्रक तयार करावे व त्यास तांत्रिक मान्यता उपविभागीय कृषि अधिकारी यांनी प्रदान करावी.

**6.6** प्रशासकीय मंजूरी मंजूर अनुदानाचे अधिन राहून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी द्यावी.

**6.7** उपरोक्त कामांकरीता प्रचलित दरसुचीचा उपयोग करण्यात यावा.

**6.8** फूटतूट दुरूस्तीची कामे घेताना दुरूस्तीनंतर सदर जलस्त्रोताचा उपयोग होणार असल्याची खात्री करावी.

**7. <u>खोल सलग समतोल चर (डीप सीसीटी)</u>**

**7.1** सदय स्थितीत पाणलोट क्षेत्र आधारित जलसंधारण कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या सलग समतल चरापेक्षा 1 मी x 1मी आकारमानाच्या खोल सलग समतोल चर तांत्रीक दृष्टया फायदेशीर आहे.

**7.2** 1 मी x 1 मी आकारमानाच्या खोल सलग समपातळी चराची प्रति हे. लांबी 240 मीटर असून अशा चरामध्ये साधारणपणे प्रति हे.240 घनमीटर पाणीसाठा होतो. यामध्ये 1 मीटर उंचीचे पाणी साठून जमिनीत मुरले जाते.माती भरावात ओलसरपणा टिकून राहतो.सदरचे कामामुळे डोंगर उतारावर मोठया प्रमाणावर होणाऱ्या जमिनीचे धुपीस प्रतिबंध होऊ शकतो.

**7.3** पाणलोट क्षेत्र आधारीत जलसंधारण कार्यक्रमांतर्गत खोल सलग समतोल चर (डीप सीसीटी) या उपचारास प्रायोगिक तत्वावर आदर्शगाव योजनेमध्ये उपचार म्हणून घेण्यास व सदर कामे मशिनव्दारे करण्यास शासन निर्णय क्र. जलसं-2010/प्र.क्र.18/जल-7 दिनांक 23.04.2010 नुसार मान्यता देण्यात आलेली आहे.या कामाचे तांत्रीक मशिनव्दारे करण्याचे आर्थिक मापदंड खालील प्रमाणे आहेत.

| उपचाराचे नांव | परिमाण | तांत्रिक मापदंड | | | आर्थिक मापदंड (रूपयात) |
|---|---|---|---|---|---|
| | | आकारमान | रनिंग मीटर | चरातील अंतर | |
| खोल सलग समपातळी चर | प्रति हे. | 1 मी x 1मी | 240 | 33 मी | 9300 |

**8. विहीरींचे पुनर्भरण -**

**8.1** अन्न धान्य उत्पादन,पिण्याच्या पाण्याचा पुरवठा,दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी व आर्थिक विकासासाठी भूगर्भातील पाणीसाठयास फार महत्व आहे. यामुळे कृषि क्षेत्रास सिंचनासाठी अस्तित्वात असलेल्या विहीरींचे पुनर्भरण करून भूजलाच्या स्थितीत वाढ करणे तसेच दुष्काळग्रस्त भागामध्ये जास्तीतजास्त पाणीसाठा जतन करणे व लोकांची सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारणे या सारखे उददेश सफल होऊ शकतात.

**8.2** याची अंमलबजावणी करताना प्राधान्याने अतिविकसीत, विकसीत व अंशता विकसीत या वर्गवारीत समाविष्ट असलेल्या गावामध्ये हा कार्यक्रम राबविण्यात यावा.

**8.3** विहीर शक्यतो पक्क्या स्वरूपाची असावी.

**8.4** ज्या विहीरींना रब्बी हंगामाच्या शेवटी पाणी कमी पडते किंवा त्या विहीरीमध्ये ऑक्टोंबर महिन्यातील पाण्याची पातळी सरासरीपेक्षा खाली असेल अशा ठिकाणी योजना राबविल्यास पावसाळयात विहीरीत पाणी मुरविणे शक्य होईल.

**8.5** गावातील जास्तीतजास्त विहीरींचे एकत्रितपणे पुनर्भरण केल्यास त्याचा फायदा लगेचच गावाला होऊ शकेल. विहीर पुनर्भरणासाठी एक खडडा पध्दत अथवा 2 खडडा पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

**8.6** विहीर पुनर्भरण विषयक महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीर व जमिनीच्या प्रकारानुसार शासन निर्णय क्र. मग्रारो-2011/प्रक्र.56/रोहयो-10-अ दिनांक 03 जून 2011 नुसार आर्थिक मापदंड निश्चित केलेले आहेत.

**9. वनराई बंधारे / कच्चे बंधारे -**

राज्यात मानसूनच्या कालावधीत पडणारा पाऊस हा वैशिष्टयपूर्ण भूस्तरीय आणि भैागोलीक रचनेमुळे पावसाचे जवळजवळ 65 ते 80 टक्के पाणी अपधावेच्या स्वरूपात वाहून जाते. त्यामुळे उन्हाळयात तीव्र पाणी टंचाई जाणवते. जलसंधारणाच्या तात्पुरत्या उपचार पध्दतीमुळे शक्यतो लोकसहभागातून वनराई बंधारे / कच्चे बंधारे बांधण्यात यावेत.ज्याठिकाणी लोकसहभाग कमी असेल अशाच ठिकाणी शासकीय निधीचा वापर

करण्यात यावा.महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये असलेल्या प्रचलीत दराप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात यावा.

**10. कोल्हापुरी पध्दतीच्या बंधाऱ्यांना दरवाजे बसविणे**

यांबाबतच्या सूचना संबंधीत यंत्रणेमार्फत निर्गमित करण्यात याव्यात.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत उपलब्ध करुन देणेत आलेला निधी हा नमुद केलेल्या बाबीवरच खर्च करणेत यावा व केलेल्या कामांचा अहवाल सोबतच्या विहित प्रपत्र ब मध्ये तसेच उपयोगिता प्रमाणपत्र विहीत प्रपत्रात (19-अे) व यशोगाथा सह आयुक्तालयास सादर करण्यात यावा.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून उपलब्ध होणारा निधी आरटीजीएस व्दारे जिल्हास्तरावर उपलब्ध करून देण्यात येत असून सदर अभियानाची अंमलबजावणी यशस्वीपणे होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

स्वाक्षरीत/-

**सोबत:-वरीलप्रमाणे.**

**संचालक,**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1**

**प्रतिलीपी माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव**

1. विभागीय आयुक्त (महसुल)
2. विभागीय कृषि सहसंचालक

**प्रत:-** मा.प्रधान सचिव (जल संधारण), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई 32 - यांना माहितीस्तव सादर.